# मावळतीचा मधुचंद्र

पंचाणव मज सरलीं, तू तर नव्वदिची नवथर बाला।
ओसरीवरी दोघे आपण कोजागिरिच्या पुनवेला॥१॥
बटा रुपेरी तुझ्या जेधवा चांदण्यामध्ये भुरभुरती।
थकल्या हृदयीं धडधड वाढे, गात्रेंही मम थरथरती॥२॥
खळया लोपुनी सायसुरकुत्या गालांवरती तव खुलती।
माझ्या शब्दां दाद देतसे लटलट मान तुझी हलती ॥३॥
मोतिबिंदु नेत्रांत चमकती, माणिकपाचू कुणा हवे?
काठ्या, चष्मे, कंबरपट्टे वार्धक्याचे साज नवे॥४॥
वदतां काही मजेत, माझी कवळी निसटुनि ये खाली।
करतां कुजबुज कानीं, मारी श्रवणयंत्र तव किंकाळी॥५॥
ऐन जवानित उच्चाराया नावहि मम लाजलीस तू।
घेत उखाणा अडलिस आता, नावचि मम विसरलीस तू!॥६॥
धूसर झाल्या स्मृती तयांची अबोध हुरहुर लागतसे।
चंद्र तुजसवें बघतां अजुनी जुनी नव्हाळी जागतसे॥७॥
विचार पुढल्या कोजागिरिचा कातर हृदयाला करतो।
असशिल किंवा नसशिल तू या भयशंकेने पोखरतो॥८॥
खंत कशाला? मागुनि तुझिया येइन मीही लगबगिने।
अधिक आगळी लज्जत येइल दोन दिसांच्या विरहाने॥९॥
निर्भय, निर्भर, चल जाऊ या चांदण्यामध्ये फिरण्याला।
अमृतवृष्टी देवो पुष्टी साथ चिरंतन ठरण्याला॥१०॥
कशास काठी? आधाराला हात गुंफुया हातांत।
सप्तपदी ही अशीच चालो अपुली सातां जन्मांत॥११॥

-डॉ. उज्ज्वला दळवी

१० जुलै, २००८.